# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 03 February 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०३ फेब्रुवारी २०२५ दुपारी १.०० वा.

****

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आज लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर चर्चा सुरु झाली. भाजपचे रामवीर सिंग बिधुरी यांनी या चर्चेला सुरुवात केली.

दरम्यान, लोकसभेत आज कामकाज सुरु होताच विरोधकांनी कुंभमेळ्याच्या मुद्यावर गदारोळ केला. कोणत्याही मुद्यावरुन कामकाजात व्यत्यय आणणं योग्य नसल्याचं, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी म्हटलं.

राज्यसभेतही विरोधकांनी विविध मुद्यांवर गदारोळ केला. मात्र त्यातही कामकाज सुरळीत सुरु आहे.

दरम्यान, लोकसभेत आज वक्फ सुधारणा विधेयकावरील संयुक्त समितीचा अहवाल सादर होणार आहे. जगदंबिका पाल यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेली संयुक्त समिती हा अहवाल सादर करेल. दिलेल्या पुराव्यांची नोंदही सभागृहासमोर ठेवली जाईल. संयुक्त संसदीय समितीने मसुदा अहवाल आणि सुधारित विधेयक स्वीकारलं तसंच विरोधी पक्षांकडून अहवालावरील त्यांच्या असहमतीच्या नोंदी सादर केल्या आहेत.

****

उत्तर प्रदेशात प्रयागराज इथं सुरु असलेल्या महाकुंभमेळ्यात वसंत पंचमीनिमित्त तिसरं अमृत स्नान आज सुरु आहे. १३ आखाड्यांमधल्या साधुसंतांसह जगभरातील कोट्यवधी भाविक श्रद्धा स्नान करत आहेत. गेल्या आठवड्यात झालेल्या चेंगराचेंगरीच्या पार्श्वभूमीवर आज याठिकाणी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. सुरक्षा व्यवस्था सुनिश्चित करण्यासाठी अर्धसैनिक दलांसह ५० हजारांहून अधिक पोलिस तैनात करण्यात आले आहेत.

दरम्यान, महाकुंभमेळ्यात आतापर्यंत जवळपास ३५ कोटी भाविकांनी पवित्र स्नान केल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

दिल्ली विधानसभा निवडणुकीचा प्रचार आज संध्याकाळी संपणार आहे. भारतीय जनता पक्ष, आम आदमी पार्टी आणि काँग्रेस हे तीन प्रमुख पक्ष रिंगणात असून, मतदारांना आकर्षित करण्यासाठी जोमाने प्रचार करत आहेत. ७० सदस्यांच्या दिल्ली विधानसभेसाठी येत्या बुधवारी पाच तारखेला मतदान होणार आहे; तर आठ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होईल.

****

आदिवासींच्या आरोग्यासाठी राज्य सरकारतर्फे सर्वसमावेशक आरोग्य धोरण तयार केलं जाईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. आदिवासींच्या आरोग्याच्या समस्या दूर करणं, केवळ भारताच्याच नाही तर जगाच्या दृष्टीने महत्वाचं आहे असं ते म्हणाले. नागपूर इथं महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ आणि नागपूर इथल्या अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'फिस्ट-2025' या आंतरराष्ट्रीय परिषदेत ते काल बोलत होते. आदिवासी भागांमधलं सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक मागासलेपण दूर करण्याच्या दृष्टीने सरकार सातत्याने काम करत असून, त्यांच्या सर्वसमावेशक विकासासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज असल्याचं मत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी यावेळी व्यक्त केलं.

****

प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेकरता बीड तालुक्यासाठी पाच हजार अठरा तर शिरूर कासार तालुक्याला तीन हजार ४९९ घरकुलांचं नवीन उद्दीष्ट प्राप्त झालं आहे. त्यामुळे बीड मतदारसंघातल्या निकषपात्र कुटुंबांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असं आवाहन, आमदार संदीप क्षीरसागर यांनी केलं आहे. पात्र कुटुंबांनी आपले प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रांसह ग्रामपंचायत मार्फत दाखल करण्यास त्यांनी सांगितलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा संशोधन संस्थेतर्फे दिला जाणारा वि. वा. देसाई स्मृती पुरस्कार छत्रपती संभाजीनगर इथल्या `मुक्तिसोपान न्यास संस्थेला जाहीर झाला आहे. स्मृतिचिन्ह आणि पंधरा हजार रुपये असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. आज हा पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान केला जाणार आहे.

****

चेन्नईहून जोधपूरकडे जाणार्या ताप्तीगंगा एक्सप्रेस मध्ये काल सायंकाळी बसण्याच्या जागेवरुन झालेल्या वादामुळे जखमी झालेला तरुण प्रवासी सुमेरसिंग जबरसिंग याचा आज उपचारादरम्यान मृत्यू झाला. या वादामध्ये चेन्नईहून जोधपूरकडे जाणार्या राजस्थानाच्या दोन प्रवाश्यांवर भुसावळहून ट्रेनमध्ये चढलेल्या प्रवाशांनी धारदार शस्त्राने हल्ला केला होता. जखमी दोघांना ट्रेनमधून उतरवून उपचारासाठी नंदुरबार जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले होतं. या घटनेप्रकरणी लोहमार्ग पोलीसांनी खूनाचा गुन्हा दाखल केला असून, आरोपीचा शोध सुरु असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

गोंदिया जिल्ह्यात अर्जुनी मोरगाव तालुक्यातल्या अरततोंडी इथं तळ्यावर बैल धुण्यासाठी गेलेल्या दोन चुलत भावांचा तलावात बुडून मृत्यू झाला. बारा वर्षीय दुर्गेश आणि रितीक यांनी आंघोळीसाठी तलावात उडी मारली, मात्र त्यांना तलावाच्या खोलीचा अंदाज न आल्याने ते पाण्यात बुडाल्याचं पोलिसांनी सांगितलं.

****

नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा प्रशासन, यांच्या संयुक्त विद्यमाने किनवट इथं येत्या आठ फेब्रुवारीला शासकीय सेवा आणि योजनांचं महाशिबीर आयोजित करण्यात आलं आहे. शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती आणि योजनांचा प्रत्यक्ष लाभ गरजूंना मिळावा, तसंच तळागाळातील व्यक्ती सुध्दा या योजनांपासून वंचित राहू नये यासाठी जनजागृती होण्यासाठी हे महाशिबीर होत आहे.

****